# रितू छाब्रिया यांना 'मुक्ताई' पुरस्कार प्रदान



पुणे येथें 'मुक्ताई' पुरस्कार माजी राष्ट्रपती प्रतीभाताई पाटील यांच्या हस्ते स्वीकारताना मीना डिसा.

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

आत्मोन्नती व विश्वशांती साधक संस्था मुंबई व श्री संत आदिशक्ती मुक्ताई विश्वकल्याण फांऊडेशनच्या वतीने मुकूल माधव फांऊडेशनच्या अध्यक्षा रितू छाब्रिया यांना 'मुक्ताई' पुरस्कार जाहीर झाला होता. पुणे येथे नुकत्याच पार पडलेल्या पुरस्कार वितरण समारंभात माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्या हस्ते संस्थेच्या सदस्या मीना डिसा यांनी हा पुरस्कार स्विकारला.

शैक्षणिक, सामाजिक व वैद्यकीय क्षेत्रामध्ये कार्यरत असणाऱ्या मुकूल माधव फाऊंडेशनने अनेकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणला आहे. त्यांच्या याच कार्याची दखल घेऊन मुकुल माधव फांऊडेशनच्या अध्यक्षा रितू छाब्रिया यांना सामाजिक व धार्मिक कार्यासाठी मुक्ताई पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी विधानसभेचे अध्यक्ष दिलीप वळसे-पाटील, आत्मोन्नती व विश्वशांती साधक संस्थेचे सोपानकाका वाल्हेकर महाराज, ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ देवीसिंह शेखावत, जळगाव येथील मुक्ताई संस्थानाचे ॲड. रवींद्र पाटील, अखिल भारती साहित्य परिषदेचे अध्यक्ष विठ्ठल पाटील, वा. ना. उत्पात, आमदार शोभा फडणवीस, श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टचे अध्यक्ष अशोक गोडसे. साईबाबा ट्रस्ट प्रतिशिर्डी शिरगावचे अध्यक्ष प्रकाश देवळे, धैर्यशील मोहिते-पाटील आदी उपस्थित होते.